International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

**श्री.राहुल शत्रुघ्न कदम**
*सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, दहिवडी कॉलेज दहिवडी*
*Corresponding Author – श्री.राहुल शत्रुघ्न कदम*
DOI - 10.5281/zenodo.18655373

**प्रस्तावना:**

आधुनिक काळामध्ये लोकशाही हा शासन प्रकार सर्वोत्तम मानला जातो. भारतामध्ये प्राचीन काळापासून लोकशाही अस्तित्वात असलेली दिसून येते. पुढे ब्रिटीश राजवटीत लोकशाही शासन व्यवस्थेचा अंगीकार करण्यात आला. लोकशाही शासन पद्धती भारतीयांना परिचयाची होती म्हणून स्वतंत्र भारतामध्ये लोकशाही शासन पद्धतीचा स्विकार करण्यात आला आहे. परंतु आज लोकशाही व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. यामध्ये अंतर्गत व बाह्य आव्हानांचा समावेश होतो. आज जगातील जवळपास सर्वच लोकशाही देशासमोर लोकशाही व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देण्याचे आव्हान उभे राहिले आहे. भारताचा विचार करता नक्षलवाद, दहशतवाद, प्रादेशिकतावाद, जातीयवाद, भ्रष्टाचार यांसारख्या समस्या निर्माण झाल्या असून या गंभीर समस्यांमुळे लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात येऊ लागले आहे.

**मुख्य शब्द: लोकशाही, लोकशाही व्यवस्था, नक्षलवाद, दहशतवाद, प्रादेशिकतावाद, धार्मिकता व जातीयवाद, भ्रष्टाचार, इत्यादी.**

**संशोधनाची उद्दिष्टे**:

१) भारतीय लोकशाहीसमोरील प्रमुख आव्हानांचा अभ्यास करणे.
२) लोकशाहीसमोरील प्रमुख आव्हानांच्या स्वरूपांचा अभ्यास करणे.
३) लोकशाहीसमोरील प्रमुख आव्हानांचा लोकशाही व्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. सदर अध्ययन विषयाच्या तथ्य संकलनासाठी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला असून यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ व वर्तमानपत्रातील लेख यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.**

**१) नक्षलवाद:**

भारतीय लोकशाही समोरील एक महत्त्वाचे आव्हान म्हणून नक्षलवाद ओळखला जाऊ लागला आहे. भारताच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेसमोरील व एकात्मतेसमोरील प्रमुख गंभीर आव्हान म्हणून नक्षलवाद उदयास आला आहे. मागील काही दशकांमध्ये या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. प्रारंभी शोषितांद्वारे ( शेतकरी) शोषणाविरुद्ध (जमीनदार ) उभारण्यात आलेल्या संघर्षातून नक्षलवादाचा उदय झाला आहे. पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यातील नक्षलबारी या गावात शेतकरी व

जमीनदार यांच्या वर्गसंघर्षातून नक्षलवादाची बीजे रोवली गेली. शेतकरी व जमीनदार यांच्यातील संघर्षातून शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याची भावना सर्वत्र निर्माण झाली. त्यातून हा संघर्ष सुरु झाला. स्थानिक शासनाने तो दडपण्याचा प्रयत्न केला. या दडपशाहीविरुद्ध चारू मुजुमदार यांच्या लेखणीने लोकजागृती घडवून आणली. व या वर्गसंघर्षाला साम्यवादी विचारधारेशी जोडले. पुढे या चळवळीमध्ये मार्क्सवादी, लेनिनवादी, माओवादी विचारधारेचे एकत्रीकरण झाले. वंचित व शोषित यांचे प्रतिनिधित्व करणारा हा लढा डाव्या विचारसरणीच्या प्रभावाखाली आल्यानंतर तेथून पुढे या चळवळीने हिंसक रूप धारण केले. प्रारंभी सुरू झालेल्या वर्गसंघर्षाला सशस्त्र स्वरूप प्राप्त झाले. सुरुवातीस शेतकऱ्यांच्या शोषणाशी संबंधित असलेली ही चळवळ हळूहळू खनिजसंपन्न अशा आदिवासी पट्ट्यात पसरली आहे.

**नक्षलवादाचे स्वरूप:** नक्षलवादाच्या स्वरूपामध्ये राजकीय नेत्याचे अपहरण करणे, त्यांच्या हत्या करणे, संरक्षक दलावर हल्ले करणे, बॉम्बस्फोट घडवून आणणे, खंडणी वसूल करणे, सामूहिक हत्याकांड घडवून आणणे, निवडणूक प्रक्रियेमध्ये बाधा आणणे, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे, शासकीय योजनांची कार्यवाही न करू देणे, रस्ते, रेल्वे, शाळा, दवाखाने, संचार साधने इत्यादींना हानी पोहचवणे, अवैध शस्त्रांची तस्करी करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणे, सर्वसामान्य लोकांमध्ये भीतीचे, दहशतीचे वातावरण निर्माण करून सामान्य जनजीवन विस्कळीत करणे इ. समावेश होतो. एकंदरीत ही चळवळ लोकशाही व्यवस्था अमान्य करून स्वतःची शासन व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करते. लोकशाही व्यवस्था ही भांडवलदारांचे समर्थन करून श्रमिकांचे, कामगारांचे शोषण करणारी व्यवस्था असून ही व्यवस्था शोषित व वंचिताना न्याय मिळवून देऊ शकत नसल्याने ती उलथवून टाकणं हाच एक मार्ग आहे असा विचार या चळवळीने रुजवला आहे. यामुळे नक्षलवाद हा लोकशाही व्यवस्थेसमोरील निर्माण झालेला गंभीर प्रश्न आहे.

**नक्षलवादाचे लोकशाहीवरील परिणाम:** नक्षलवादाचे लोकशाहीवर पुढील परिणाम झाले आहेत.

१) मुळतः नक्षलवादी चळवळ ही डाव्या विचारसरणीवर अवलंबून असल्याने त्यांना लोकशाही व्यवस्था मान्य नाही तसेच त्यांचा लोकशाही व्यवस्थेवर विश्वास नाही त्यामुळे लोकशाही शासन व्यवस्थेला त्यांचा विरोध होत आहे.

२) नक्षलवाद्यांना लोकशाही व्यवस्था अमान्य असल्याने त्यांनी पर्यायी शासन व्यवस्थेची निर्मिती केलेली आहे.

३) नक्षलवादी आतंकवाद, तस्करी अशा राष्ट्रविरोधी शक्तींना बळ देण्याचा प्रयत्न करतात.

४) नक्षलवादी नक्षलग्रस्त प्रदेशात हिंसक कारवाया करून भीती व अनिश्चितेचे वातावरण तयार करतात.

५) नक्षलवादी अपहरण, खंडणी, लूट यांच्या माध्यमातून हिंसाचार घडवून आणतात.

६) नक्षलवादी कारवायांमुळे विकास प्रक्रिया खंडित होते, विकास कार्यामध्ये अडथळे येतात.

७) अशिक्षित आदिवासींना बळजबरीने नक्षलवादाची ढाल बनवून त्यांचे शोषण करत आहेत.

८) नक्षलवाद्यांचा प्रभाव हा खनिज संपन्न अशा प्रदेशाच्या पट्ट्यात असल्याने ते संसाधनांची तस्करी करू लागले आहेत.

अशाप्रकारे नक्षलवादी चळवळीचा लोकशाही व्यवस्थेवर वरीलप्रमाणे परिणाम झालेला दिसून येत आहे.

**२) दहशतवाद:**

दहशतवाद हा भारतीय लोकशाही व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान म्हणून उदयास आला आहे. दहशतवाद हा भारताच्या सार्वभौमत्वाला व राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान देणारा एक महत्त्वाचा अडसर म्हणून

पुढे आलेला आहे. भारतामध्ये दहशतवाद हा विभाजनकारी प्रवृत्तीतून निर्माण झालेला आहे. अलीकडील काळात दहशतवादाला जातीय व धार्मिक स्वरूप प्राप्त झाल्याने गंभीर समस्या निर्माण होत आहेत. राजकीय उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी सर्वसामान्य नागरिक आणि व्यवस्थेच्या विरोधात हिंसेचा वापर करून त्याद्वारे समाजात भीती आणि दहशत पसरवणे याला 'दहशतवाद' म्हटले जाते. दहशतवादामध्ये अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योजनाबद्ध पद्धतीने समाजात भय व निराशाचे वातावरण हिंसेच्या आधारे पसरवण्याचा प्रयत्न केला जातो. दहशतवादी लोकशाही व्यवस्था अमान्य करतात. लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये बाधा उत्पन्न करतात.

**दहशतवादाचे स्वरूप:** दहशतवादी कारवाया मध्ये सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, राजकीय नेत्यांचे अपहरण करणे व हत्या करणे, विमान अपहरण करणे, सुरक्षा सैन्यांवर हल्ले करणे, धार्मिक द्वेष पसरवणे, आत्मघातकी हल्ले करणे, जाळपोळ लुटालुट करणे, निवडणूक प्रक्रिया बाधित करणे, निष्पाप लोकांची हत्या करणे, सामूहिक हत्याकांड घडवून आणणे, विशिष्ट धर्म, जात व प्रदेश इत्यादींच्या लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणे इत्यादीचा समावेश होतो.

**दहशतवादाचे लोकशाहीवरील परिणाम:** दहशतवादाचे लोकशाहीवर पुढील परिणाम झाले आहेत.

१) दहशतवादी आपल्या हिंसक कारवायांच्या माध्यमातून लोकांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण तयार करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करतात.

२) दहशतवादाच्या हिंसक कारवायामुळे जीवित व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

३) दहशतवादी कारवायामुळे विकास प्रक्रिया बाधित होते.

४) दहशतग्रस्त भागामध्ये अनिश्चिततेचे व भीतीचे वातावरण तयार होते.

५) वारंवार होणाऱ्या दहशतवादी कारवायांमुळे राष्ट्राच्या एकात्मतेला तडा जातो.

६) दहशतवादी कृत्यांपासून देशाच्या संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात संरक्षण खर्चामध्ये तरतूद करावी लागते त्याचा नकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो.

अशाप्रकारे दहशतवाद लोकशाही व्यवस्थेसमोर वरील प्रमाणे नकारात्मक परिणाम घडवून आणतो.

**३) धार्मिकता व जातीयवाद:**

भारतामध्ये विविध जातीचे व धर्माचे लोक राहत आहेत. परंतु मागील काही दशकांमध्ये धार्मिक कट्टरता व जातीयवाद या दोन गोष्टींनी भारताची अखंडता व एकात्मतेपुढे गंभीर समस्या निर्माण केली आहे. भारतामध्ये लोकशाही व्यवस्था रुजवण्यामध्ये या दोन घटकांची सर्वात मोठी बाधा निर्माण झाली आहे. भारतामध्ये अलीकडील काळात धार्मिक कट्टरतेमध्ये वाढ झाल्याने धार्मिक द्वेष मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊ लागला आहे. त्यातून सांप्रदायिकता, धर्मांधता व जातीयता यांना खतपाणी मिळत आहे. इतर धर्मापेक्षा आपला धर्म श्रेष्ठ आहे ही भावना, इतर धर्माप्रती असलेली असहिष्णुवृत्तीमुळे धार्मिक कट्टरता वाढत आहे. तसेच आपल्या जातीला इतर जातीपेक्षा अधिक श्रेष्ठ समजणे, आपल्या जातीच्या हितसंबंधाची जोपासना करणे यातून जातीयवाद वाढत आहे. अलीकडील काळात राजकारणात धर्म व जात हा महत्त्वाचा मुद्दा बनला असून इतर मुद्द्यांना दुय्यम स्थान मिळालेले आहे. त्यामुळे धर्म व जाती आधारित राजकारण लोकशाही व्यवस्थेला कमकुवत करत असल्याचे दिसून येते.

**धार्मिकता व जातीयवादाचे स्वरूप:** भारतामध्ये धार्मिक दंगली, जाती आधारित सामाजिक व आर्थिक लाभ, धर्म व

जातीच्या आधारावर उमेदवाराची निवड करणे, धर्म व जातीच्या आधारावर प्रचार करणे, निवडणुकांमध्ये धर्म व जातीच्या आधारावर मतदान करणे, राजकीय पक्षांनी धर्म व जातीला जनाधाराचे स्वरूप बनवणे, काही जातींना व धर्मांना जास्त महत्त्व देणे, सरकारमध्ये धर्म व जातीच्या आधारावर प्रतिनिधित्व देणे, इ. समावेश धार्मिक व जातीयवादाच्या स्वरूपामध्ये होतो.

**धार्मिकता व जातीयवादाचे लोकशाहीवरील परिणाम:-** धार्मिकता व जातीयवादाचे लोकशाहीवर पुढील परिणाम झाले आहेत**.**

१) धार्मिकता व जातीयवादामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता यांसारख्या लोकशाही मूल्यांच्या अंमलबजावणीमध्ये बाधा उत्पन्न होत आहे.

२) धार्मिक कट्टरता व जातीयवादामुळे राष्ट्रीय एकात्मतेला व अखंडतेला धोका उत्पन्न होत आहे. राष्ट्रीय एकात्मता बाधित होत आहे.

३) धार्मिकता व जातीयवादामुळे विविध जाती धर्मीयांमध्ये परस्परविरोधी अविश्वासाचे वातावरण तयार होऊन त्याचे रूपांतर द्वेषामध्ये होऊ लागले आहे, लोकांमधील बंधुभावाची भावना नष्ट होत आहे त्यामुळे समाजामध्ये फूट पडत आहे.

४) धार्मिकता व जातीयवादातून दंगली भडकल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन सामान्य जनजीवन विस्कळीत होत आहे.

५) धार्मिक व जातीय दंगलीमुळे शेकडो निष्पाप लोकांना प्राण गमवावे लागत आहेत त्यामुळे जीवित हानी होत आहे.

६) धार्मिकता व जातीयवादामुळे राष्ट्रीय सुरक्षेसमोर सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

७) बहुसंख्यांकच्या धार्मिक कट्टरतेतून व जातीयवादातून धार्मिक व जातीय राष्ट्रवाद उदयास येत आहे.

८) धार्मिकता व जातीयवादामुळे निर्माण झालेल्या संघर्षातून समाजामध्ये तणावाचे वातावरण निर्माण होत आहे त्यामुळे सामाजिक शांतता भंग पावत आहे.

९) तसेच अल्पसंख्याक समाजामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे.

१०) धार्मिकता व जातीयवादातून राष्ट्रविरोधी शक्तींना बळ मिळत आहे.

अशाप्रकारे धार्मिकता व जातीयवादामुळे वरील नकारात्मक परिणाम भारतीय लोकशाहीवर होत आहेत.

**४) प्रादेशिकतावाद:**

भारतामध्ये भौगोलिक विविधता मोठ्या प्रमाणात आहे. विविधतेने नटलेल्या या देशात प्रादेशिक विविधता दिसून येते. या विविधतेमध्ये एकता निर्माण करण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केलेला आहे. मात्र अलीकडील काळात प्रादेशिकतावादाची पाळेमुळे खोलवर रुजू लागली आहेत. जेव्हा एखाद्या क्षेत्र विशेषातील लोक संपूर्ण राष्ट्रीय हिताऐवजी आपल्या क्षेत्र विशेषाला अधिक महत्त्व देतात त्या भावनेला 'प्रादेशिकतावाद' म्हणतात. प्रादेशिकता ही केवळ भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय, भाषिक समस्याच नाही तर आर्थिक, सामाजिक ऐतिहासिक, विकासात्मक समस्या देखील आहे. प्रादेशिक अस्मिता, प्रदेशाभिमान यांच्या अतिरेकी स्वरूपामुळे प्रादेशिकतावाद निर्माण होतो, तेव्हा प्रादेशिकता ही राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेपुढील समस्या बनते. भारतीय लोकशाही समोर निर्माण झालेल्या अनेक समस्यांमध्ये प्रादेशिकतावादाला अग्रक्रम प्राप्त झालेला दिसून येतो. भाषा, धर्म, संस्कृती हे घटक प्रादेशिकतावादास प्रोत्साहन देतात. भारतातून फुटून स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न प्रादेशिकतावादातून झालेला दिसतो. त्यामध्ये नागालॅंड, खलिस्तान, बोडोलॅंड यासारख्या स्वतंत्र राष्ट्राची मागणी त्या त्या भागातील काही

विघटनकारी शक्तीने सुरू केलेली आहे. यामुळे प्रादेशिकतावाद भारतीय लोकशाही समोरील एक महत्त्वाचे आव्हान बनले आहे.

**प्रादेशिकतावादाचे स्वरूप**: भारतामध्ये भौगोलिक परिस्थितीतील भिन्नता, सांस्कृतिक विविधता, भाषिक विविधता, विकासातील असमतोल, धार्मिक विविधता, जनजातीय अस्मिता इत्यादीमुळे प्रदेशाभिमान निर्माण होतो. प्रादेशिक अस्मिता, प्रदेशाभिमान यांच्या अतिरेकी स्वरूपामुळे पुढे त्याचे प्रादेशिकतावादात रुपांतर होते.

**प्रादेशिकतावाचे लोकशाहीवरील परिणाम:** प्रादेशिकतावादामुळे लोकशाहीवर पुढील परिणाम झाले आहेत**.**

१) भारतातून फुटून स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न प्रादेशिकतावादातून होत आहे. यामुळे राष्ट्र विघटनाचा धोका निर्माण झालेला आहे.

२) राज्याराज्यमध्ये निर्माण झालेल्या प्रादेशिक असंतुलनामुळे स्वतंत्र राज्याची मागणी होत आहे. उदा. महाराष्ट्रामध्ये विदर्भ

३) विकासातील असमतोल व प्रादेशिक अस्मिता जपण्याच्या प्रयत्नातून भारतातील काही राज्यांनी आपल्या राज्याला विशेष दर्जा देण्याची मागणी केलेली दिसून येते. यातून प्रादेशिकतावादाचा एक नवा आविष्कार पाहायला मिळतो.

४) स्थलांतरित झालेल्या नागरिकांच्या द्वेशातून प्रादेशिकतावादाची मागणी होते.

५) भाषेच्या आधारावर राज्याची मागणी करताना झालेल्या निदर्शन, हिंसाचारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो.

अशाप्रकारे प्रादेशिकतावादामुळे वरील नकारात्मक परिणाम लोकशाहीव्यवस्थेवर होतो.

**५) भ्रष्टाचार:**

भ्रष्ट आणि आचरण या दोन शब्दापासून भ्रष्टाचार हा शब्द तयार झाला आहे. भ्रष्ट म्हणजे अनैतिक आचरण किंवा व्यवहार. एखाद्या व्यक्तीचे वर्तन हे नीतिमत्तेला धरून नसेल तर त्याला भ्रष्टाचार असे म्हटले जाते. भ्रष्टाचार हा लोकशाहीच्या मार्गातील एक अडथळा आहे. भ्रष्टाचार ही सर्वसमावेशक संकल्पना आहे. भारतीय शासन व्यवस्था , राजकारण यामध्ये भ्रष्टाचार कार्कारोगासारखा झपाट्याने पसरत असून रोज नवनवीन भ्रष्टाचाराची प्रकरणे समोर येत आहेत. भ्रष्टाचारामुळे एक समांतर व्यवस्था तयार झालेली असते. त्यामुळे ती व्यवस्था लोकशाहीसाठी मारक ठरते.

**भ्रष्टाचाराचे स्वरूप:** शासकीय कार्यपद्धतीविषयीची अनभिज्ञता, नियमांची परिदृढता, अधिकारांचा गैरवापर, नीतिमूल्यांचा ऱ्हास, लाल फितशाही, लाचखोरी, राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार निर्मूलन करण्यासाठी स्वतंत्र वैधानिक संस्थांचा अभाव इत्यादीमुळे भारतात भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनला असून त्याचे प्रस्त वाढले आहे.

**भ्रष्टाचाराचे लोकशाहीवरील परिणाम:** भ्रष्टाचारामुळे लोकशाहीवर पुढील परिणाम झाले आहेत**.**

१) भ्रष्टाचारामुळे शासकीय विश्वासार्हता कमी होत आहे.

२) भ्रष्टाचारामुळे निकृष्ट दर्जाचे कामे होत आहेत.

३) भ्रष्टाचारामुळे काळया पैशाचे प्रमाण मोढ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे त्याचा उपयोग देशविघातक कृत्यात होऊ लागला आहे.

४) भ्रष्टाचारामुळे सामाजिक, आर्थिक विषमता वाढत आहे. गरीब अधिक गरीब तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालला आहे.

५) भ्रष्टाचारामुळे आर्थिक विकासाची गती मंदावते आहे.

६) भ्रष्टाचारामुळे लोकशाही मूल्यांच्या ऱ्हास होताना दिसून येत आहे.

अशाप्रकारे भ्रष्टाचारामुळे वरील नकारात्मक परिणाम लोकशाहीव्यवस्थेवर होत आहे.

**निष्कर्ष:**

भारतातील लोकशाही व्यवस्थेसमोर नक्षलवाद, दहशतवाद, प्रादेशिकतावाद, धार्मिकता, जातीयवाद, भ्रष्टाचार यांसारख्या अंतर्गत व बाह्य समस्यामुळे विविध आव्हाने उभी केली आहेत. या गंभीर आव्हानामुळे लोकशाहीव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होत आहे. तसेच या समस्येमुळे लोकशाही व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देण्याचे नवीन संकट भारतासमोर उभे राहिले आहे. याशिवाय आर्थिक विषमता, फुटीरतावादी चळवळी, राजकीय गुन्हेगारीकरण, भाषावाद, धार्मिक राजकारण यासारख्या समस्येमुळे लोकशाहीसमोर कमीअधिक प्रमाणात आव्हाने निर्माण केली आहेत. भारतातील लोकशाही व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१. लोणारकर प्रवीण, भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २०२४
२. भोळे भा.ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपुर, २०१५
३. पाटील बी. बी. & चव्हाण उर्मिला, भारतातील राजकीय प्रक्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०२४
४. प्रकाश बाळ व किशोर बेडकीहाळ, भारतीय राजकीय व्यवस्था(प्रक्रिया आणि स्वरूप), आंबेडकर अकादमी, सातारा, २००२